# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**जा.क्र.कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५** **दि.१८ ऑगस्ट २०२५**

जळगाव दि. १८ प्रतिनिधी : आजच्या युगात गुंतागुंत हाताळणारे, समीक्षात्मक विचार करणारे व भावनिक हुशारी असणारे विद्यार्थी तयार होणे आवश्यक आहे, विकसित राष्ट्र व समाज निर्माण करण्यास योगदान देऊ शकणारे सक्षम तरुण घडविण्याचे आव्हान पुरस्कारार्थी शिक्षकांनी पेलावे अशी अपेक्षा कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार वितरण व कार्यगौरव सोहळा समारंभात व्यक्त केली.

यावेळी मंचावर मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र - कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे, डॉ. संजीव गिरासे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. म सु पगारे, प्रा. शिवाजी पाटील, ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, डॉ. पवित्रा पाटील, अधिष्ठाता डॉ. जगदीश पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी रवींद्र पाटील, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील आदी उपस्थित होते.

विद्यापीठातर्फे आज दि. १८ ऑगस्ट रोजी अधिसभागृहात हा समारंभ आयोजित करण्यात आला त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कुलगुरू प्रा. माहेश्वरी बोलत होते. प्रा. माहेश्वरी पुढे म्हणाले की, चांगले विद्यार्थी घडविण्यासाठी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे आवाहन केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी विद्यापीठाने उच्चस्तरीय समिती नेमली होती. बहिणाबाईंचे ज्या क्षेत्रात काम आहे त्याच क्षेत्रात काम करणाऱ्या डॉ. गिरासे यांना हा पुरस्कार मिळाला आहे. कार्यगौरव सोहळा निमित पुरस्कार प्राप्त सर्वांचे कौतुक केले. १९९० मध्ये विद्यापीठ स्थापना झाली, तेव्हा विद्यापीठ अंतर्गत ८० महाविद्यालय होती मात्र आज ही संख्या वाढली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून चौथ्या साखळीतही नॅक अ श्रेणी विद्यापीठाला प्राप्त झाली असून परदेशी विद्यार्थ्यांची प्रवेश घेण्याची संख्या देखील वाढत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण बाबतीत विद्यापीठाने उकृष्ट काम करत मराठी भाषेतून शिक्षण यावर भर दिला आहे. तसेच मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी खुल्या विकल्प विषयासाठी १४ पुस्तके विद्यापीठाने मराठी भाषेतून प्रकाशित केली असून इतर शिक्षकांनी ५० पुस्तके तयार केली आहेत. अप्रेंटिसशिप एंबेडेड डिग्री प्रोग्राम अंतर्गत ५ अभ्यासक्रम सुरू केले आहेत. दोन अभ्यासक्रम एकाच वेळी पूर्ण करण्याची मुभा विद्यापीठाने या वर्षापासून सुरू केल्याची माहिती कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी दिली आहे.

प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमात बोलताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी म्हणाले की, कार्यसंस्कृती विद्यापीठाच्या स्थापनेपासून सर्व कुलगुरूंनी जोपासली आणि खूप पुढे नेली आहे. विद्यापीठाच्या कार्यसंस्कृतीचा महाराष्ट्राच्या इतर विद्यापीठांच्या ठिकाणी विशेष उल्लेख होतो याचा अभिमान वाटतो.

विकसित भारत घडविण्यात विद्यापीठांची भूमिका अत्यंत महत्वाची असून विकसित भारतासाठी कुशल मनुष्य बळ विकसित होणे महत्त्वाचे आहे. यासाठी उच्च शिक्षण मध्ये पाच भाग यात नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे, शिक्षणातील आंतर विद्याशाखीय अभ्यास, जागतिक स्तरावर भारताचे शोध निबंध वाढवणे, इंडस्ट्रीच्या दृष्टीने पेटंट ची संख्या वाढवणे, जगातल्या मोठ्या विद्यापीठांशी शैक्षणिक सामंजस्य करार करणे या आवश्यक बाबी आहेत असे सांगून पुरस्कार्थींनीं उत्तम विद्यार्थी घडवून विद्यापीठाचे नावलौकिक वाढवावे असे आवाहन केले.

या समारंभात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा राज्यपातळीवरील प्रतिष्ठेचा असा सन २०२५ चा साहित्य क्षेत्रासाठी असलेला कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार धुळे येथील डॉ. संजीव गिरासे यांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे उत्तर देताना डॉ. गिरासे म्हणाले की, कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या नावाने मला पुरस्कार मिळाला ही बाब माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. बहिणाबाईंनी खान्देशच्या मातीशी असलेली निष्ठा त्यांच्या साहित्यातून मांडली. बहिणाबाईच्या याच वाटेवरून माझी पुढची वाटचाल राहील.

कार्यक्रमाच्या सुरवातीस प्रास्ताविक प्र - कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी करत कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्काराची पार्श्वभूमीवर स्वरूप आणि महत्व समजावून सांगितले. तसेच आज वितरित करण्यात आलेल्या विविध सत्कार आणि पुरस्कार वितरण सोहळ्यासंदर्भात माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. विजय घोरपडे व श्रीमती वैशाली शर्मा यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास पुरस्कार्थी, अधिसभा सदस्य, विद्यापरिषद सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थाचालक, प्रशाळा संचालक, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या समारंभात खालील प्रमाणे पुरस्कार वितरित करण्यात आले.

**उत्कृष्ट महाविद्यालय, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व संशोधक पुरस्कार विजेते** पुढील प्रमाणे

**उत्कृष्ट महाविद्यालय / परिसंस्था - १)** महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमती शरदचंद्रिका सुरेश पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, चोपडा **(व्यावसायिक), २)** नंदुरबार तालुका विधायक समितीचे गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार **(अव्यावसायिक), उत्कृष्ट प्राचार्य –** प्राचार्य डॉ. सुनील पवार (पुज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा), **उत्कृष्ट शिक्षक (महाविद्यालय) – १)** डॉ. शशिकांत वग्गे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव) **२)** डॉ. ज्ञानेश्वर सुर्यवंशी (विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे), **उत्कृष्ट शिक्षक (विद्यापीठ)** १) **प्रा.** सतीष कोल्हे (संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव), **२)** प्रा. प्रवीण पुराणिक (जैवशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव), **उत्कृष्ट अधिकारी (विद्यापीठ वर्ग - १) –** नवलसिंग पाटील (उपकुलसचिव, प्रशासन विभाग), **उत्कृष्ट अधिकारी (विद्यापीठ वर्ग** -२) – शरद पाटील (सामान्य प्रशासन / रा.से.यो. विभाग), **उत्कृष्ट कर्मचारी (विद्यापीठ वर्ग -३) – १)** भरत उफाडे (वरिष्ठ सहायक, गणितशास्त्र प्रशाळा), **२)** गिरीष पाटील (वरिष्ठ सहायक,वित्त विभाग), **३)** संजू पाटील (सहायक, सामान्य प्रशासन विभाग), ४) जगदीश शिवदे (लघु लेखक (नि.श्रे.), रा.से.यो. व क्रीडा विभाग), **उत्तेजनार्थ :** ५) रवींद्र सोनवणे (डाटा एन्ट्री ऑपरेटर, संगणक केंद्र,

परीक्षा विभाग), ६) अरवींद पाटील (वाहनचालक, सामान्य प्रशासन विभाग) **उत्कृष्ट कर्मचारी (विद्यापीठ वर्ग -४) १)** श्रीमती सविता पगारे (शिपाई, प्र-कुलगुरू कार्यालय), **२)** दिलीप कोचुरे (प्रयोगशाळा परिचर, बांधकाम), **उत्तेजनार्थ :** ३) श्रीमती प्रतिभा पवार (कुशल परिचर, संगणक शास्त्र प्रशाळा), ४) चंद्रकांत पाटील (कुशल परिचर, सामान्य प्रशासन विभाग), **दैनिक वेतनिक विद्यापीठ उत्तेजनार्थ** :१)दिनेश वाघ (अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष), २) नाना संदानशिव (पाणी पुरवठा विभाग), ३) निलेश सोनवणे (अतिथीगृह विभाग), **संलग्नित महाविद्यालय / परिसंस्था उत्कृष्ट अधिकारी (महाविद्यालय वर्ग -२) –**जितेश जाधव (रजिस्ट्रार, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), **उत्कृष्ट कर्मचारी (महाविद्यालय वर्ग -३) -१)** दिनेश पाटील (सहायक ग्रंथपाल, महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे दादासाहेब सुरेश पाटील महाविद्यालय, चोपडा), **२)** हेमंत गायकवाड (प्रयोगशाळा सहायक, बी.पी. आर्टस, एस.एम.ए. सायन्स व के.के.सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव), ३) सौ. सोनल शहा (लिपीक, एच.आर. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ४) जितेंद्र चौधरी (वरीष्ठ लिपीक, संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य वरीष्ठ महाविद्यालय, खापर), **उत्कृष्ट कर्मचारी (महाविद्यालय वर्ग -४) - १)** कृष्णा गवळी (शिपाई, के.सी.ई.संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च जळगाव), २) मच्छिंद्र जाधव (प्रयोगशाळा परिचर, पाचोरा ता.को.ऑ.संस्थेचे शेठ मुरलीधरजी मानसिंगका कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा), **३)** गणेश गोसावी (शिपाई, एच.आर. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर) , ४) कैलास सोलंकी (प्रयोगशाळा परिचर, सातपुडा शि.प्र.मंडळाचे वसंतराव नाईक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा)

विद्यापीठ शिक्षकांसाठी संशोधन पुरस्कार (प्रकाशन) : **१)** प्रा. जितेंद्र नाईक (रासायनिक तंत्रज्ञान संस्था), २) डॉ. वंदना शिंदे (भौतिकशास्त्र प्रशाळा (कंत्राटी शिक्षिका)) ३) डॉ. विकास पाटील (रासायनिक तंत्रज्ञान संस्था), ४) डॉ. संजय घोष (भौतिकशास्त्र प्रशाळा) ५) प्रा. श्रीमती आर.एस. बेंद्रे, (रसायनशास्त्र प्रशाळा), ६)प्रा. एस.एन पाटील (पर्यावरणशास्त्र प्रशाळा),

महाविद्यालयीन शिक्षकांसाठी संशोधन पुरस्कार (प्रकाशन ) - १) डॉ. शैलेश चालिकवार (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), २) डॉ. प्रकाश लभाणे (महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा), ३) डॉ. गणेश पाटील (एच.आर. पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ४) डॉ. गुणवंत सोनवणे (किसान विद्या प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारोळा) ५) डॉ. कैलास मोरावकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ६) डॉ. पंकज जैन (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर) ७) डॉ. हारूण पटेल (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ८) डॉ. विनोदकुमार उगले (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ९) डॉ. उज्वलदीप देवरे (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), १०) डॉ. हितेंद्र महाजन (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ११) डॉ. अतुल शिरखेडकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), १२) डॉ. मोहन कळसकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), १३) डॉ. प्रवीण पाटील (एच.आर. पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर),

**संशोधन (स्वामित्वहक्क) पुरस्कार –**१) डॉ. सौरभ गणोरकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर), २) डॉ. शैलेश चालिकवार (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ३) डॉ. कैलास मोरावकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर)

**संशोधन (निधी) पुरस्कार : १)** डॉ. राहुल कुलकर्णी **(** बी.पी. आर्टस, एस.एम.ए. सायन्स व के.के.सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव) २) डॉ. हारूण पटेल (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ३) डॉ. राहुल ताडे (एच.आर.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ४) डॉ. ज्ञानेश्वर सुर्यवंशी (विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे)

**उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार :** डॉ. तुषार पाटील (एसएसव्हीपीएसचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,शिंदखेडा)

**उत्कृष्ट संचालक शारीरिक शिक्षण पुरस्कार :** प्रा. गोविंद मारतळे (तापी परिसर विद्या मंडळ संचलित धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर)

**महाविद्यालयात केंद्रीय मुल्यमापन केंद्र यशस्वीरित्या राबविणारे महाविद्यालय जळगाव जिल्हा:** उत्कृष्ट समन्वयक व संचालक प्रा. हर्षल पाटील (पी.ओ.नाहाटा महाविद्यालय, भुसावळ), उत्कृष्ट समन्वयक पुनाजी पाटील व संचालक खान शफीकुर्रहेमान अब्दुन नबी (केसीइ सोसायटीचे मॅनेजमेंट व रिसर्च, जळगाव), उत्कृष्ट समन्वयक जे. पी. नेहेते व संचालक एच. एम. बावीस्कर (सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालय, ऐनपूर)

**धुळे जिल्हा :** उत्कृष्ट समन्वयक व संचालक प्रा. संदीप सोलंकी (एस. पी. डी.एम. महाविद्यालय, शिरपूर), उत्कृष्ट समन्वयक मंदार पाटील व संचालक डॉ. डी. के. पाटील ( झेड बी पाटील महाविद्यालय, धुळे)

**नंदुरबार जिल्हा :** उत्कृष्ट समन्वयक प्रा.विजय सिसोदीया व संचालक डॉ. रुपेश देवरे (जी टी पी महाविद्यालय, नंदुरबार), उत्कृष्ट समन्वयक व संचालक प्रा. अनंत देशमुख (जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार)

**तिन्ही जिल्हयातील उत्कृष्ट केंद्रीय मुल्यमापन केंद्र असेलेले** (उत्तरपत्रिकांचे सर्वाधिक मुल्यांकन केलेले) महाविद्यालय: प्राचार्य डॉ.महेंद्र जयपालसिग रघुवंशी (जीटीपी महाविद्यालय, नंदुरबार)

**निर्धारीत संख्येपेक्षा जास्त उत्तरपत्रिकांचे सर्वाधिक मुल्यांकन केलेले महाविद्यालय : जळगाव जिल्हा** : लोकसेवक मधुकरराव औषधी निर्माणशास्त्र महाविद्यालय, फैजपूर, व श्रमसाफल्य एज्यु. सोसा चे समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर.

**धुळे जिल्हा**: आर सी पटेल इंस्टीटयुट ऑफ फार्मास्युटीकल एज्यु.रिसर्च , शिरपूर

**नंदुरबार जिल्हा** : शहादा तालुका एज्यु. सोसा. व को ऑप एज्यु सोसा लि चे विज्ञान वरीष्ट महाविद्यालय शहादा.

---

मा. संपादक.

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता